प्रेस रिलिज

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया
www.rbi.org.in
www.rbi.org.in\hindi
e-mail: helpprd@rbi.org.in

प्रेस रिलेशन डिव्हीजन, सेंट्रल ऑफिस, पो.ऑ.बॉक्स ४०६, मुंबई ४००००१
फोन नं.२२६६०५०२, फॅक्स २२६६०३५८, २२७०३२७९

**नोव्हेंबर ३, २००५**

## पंचवीस पैशांची नाणी व्यवहारांसाठी आजही ग्राह्य आहेत! रिझर्व्ह बँकेचा खुलासा

सरकारी खात्यांसह, सरकारी उपक्रम, सेवाउद्योग, व्यावसायिक आणि दुकानदारांकडून रिझर्व्ह बँकेकडे सातत्याने तक्रारी येत होत्याच शिवाय असे लक्षात आले आहे की, सर्वसाधारणपणे अर्थिक आणि व्यावसायिक क्षेत्रात असा समज पसरला आहे की, पंचवीस पैशांची नाणी रद्द झाल्याने, चलनातून बाद करण्यात आली आहेत. रिझर्व्ह बँक जाहीर करीत आहे की, अशा बिनबुडाच्या बातम्यांवर विश्वास ठेवू नये. पंचवीस आणि पन्नास पैशांची नाणी ही आजही कायदेशीर असून ती सहजतेने उपलब्धहि आहेत. सबब नागरिकांनी पुर्वीप्रमाणेच, न बिचकता पंचवीस पैशांच्या व पन्नास पैशांच्या नाण्यांचा चलनात वापर करावा.

**जी. रघुराज**
**उपमहाव्यवस्थापक**

**प्रेस रिलिज : २००५-२००६/५३७**